इंडियन इन्स्टिटयूट ऑफ रूरल वर्कर्स

# जन शिक्षण संस्थान, औरंगाबाद

भारत सरकार पुरस्कृत

कौशल्य विकास उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली

(श्रमिक विद्यापीठ स्थापना १९८५)




संस्थापक अध्यक्ष

# माहिती पत्रक

**सर्व समाजास ''प्रशाला'' बनविण्याचा प्रयोग**

To Make the Society 'A' Learning Society



Baking



Food Preservation



Tailoring



Computer Training



Handicrafts



Photography



Electronics & Hardware



Arts and Crafts


## माहिती तसेच पत्रव्यवहारासाठी पत्ता

भारत सरकार पुरस्कृत

## जन शिक्षण संस्थान, औरंगाबाद

## (श्रमिक विद्यापीठ )

काबरा निवास, खडकेश्वर, औरंगाबाद - ४३१००१.

दूरध्वनी क्र. : ०२४०-२३४९४११

**Email : -** jssabad.org@gmail.com, msaurangabad.jss@nic.in

❖ **स्थापना :** भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालय, राष्ट्रीय साक्षरता मिशन, शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत ०१ डिसेंबर १९८५ साली मराठवाड्यातील पहिले व भारतातील ३४ वे जन शिक्षण संस्थान (श्रमिक विद्यापीठ) औरंगाबाद येथे सुरू झाले आहे. आजच्या युगात व्यवसाय कौशल्याने महत्त्व पाहता आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी ही योजना केंद्रशासनाने कौशल्य विकास व उद्योजकता विकास मंत्रालयात वर्ग करण्यात आलेली आहे. २०२१ या वर्षामध्ये भारतात ३०१ जन शिक्षण संस्थान देशभरात सुरू आहे.

❖ **उदिष्टे :**

**१)** सातत्याने शिक्षणाची प्रेरणा असलेला समाज प्रशिक्षणाद्वारे निर्माण करण्याच्या उद्देशाने भारतात श्रमिक विद्यापीठाची अर्थात जन शिक्षण संस्थानची स्थापना करण्यात आली आहे.

**२)** प्रशिक्षणाद्वारे कामगारांच्या व बेरोजगार तरूणांच्या विकासाचा प्रयत्न करणे, समाजाचा एक घटक या नात्याने प्रशिक्षणामध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे.

**३)** कुटुंब कल्याणासाठी जाणिव-जागृतीचे कार्यक्रम आखणे.

**४)** परंपरागत शिक्षणाच्या चाकोरीबध्द चौकटीतून नैराष्याच्या भावनेतून हतबल झालेल्या तरूणांना स्वावलंबी बनविण्याकरीता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे.

**५)** आर्थिक क्षेत्रात स्वतःचा लघु उद्योग सुरू करून स्वावलंबी बनून वैयक्तिक विकास साधण्यासाठी महिलांसाठी निरनिराळ्या व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे.

**६)** अकुशल कामगार/निमकुशल कामगार यांच्या व्यावसायिक कौशल्यात व तांत्रिक ज्ञानात वाढ करून त्यांची कार्यकुशलता वाढावी यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करणे.

**७)** जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास दर्जा वाढविणे, लक्ष्य असलेल्या घटकांना कर्ज/वित्तीय सहयोग वाढवून स्वयंरोजगार वाढविण्यास मदत करणे.

**८)** जिल्ह्यातील पारंपारिक कौशल्याच्या शोध घूवन त्यासंदर्भात प्रशिक्षणाचे आयोजन करून प्रचार व प्रसार करणे.

**९)** समाजातील नागरिकांचे व त्यांच्या कुटुंबियाचे जीवनमान (क्वालिटी ऑफ लाईफ) सुधारण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

**१०)** बचतगट स्थापन करुन, बचत गटांनां आवश्यक व्यवसाय प्रशिक्षण सुरु करणे.

❖ **वैशिष्ट्ये :**

१) **किमान गट :** किमान २० प्रशिक्षणार्थ्यांनी येऊन विनंती केल्यास त्यांच्या सोई प्रमाणे प्रमाणित कोर्स (अभ्यासक्रम) सुरू केला जाऊ शकतो.

२) **गरजेनुसार शिक्षणक्रम :** सभोवतालच्या परिस्थितीनुसार व समाजाच्या आणि प्रशिक्षाणार्थ्यांच्या निश्चित गरजेनुसार शिक्षणक्रम चालविले जातात.

३) **शिक्षणाची व वयाची अट :** १६ वर्षापुढील शिक्षण अर्धवट सुटलेले, ८ वी पास नापास युवक - युवती व महिला जन शिक्षण संस्थानच्या व्यवसाय कौशल्य प्रशिक्षणास पात्र ठरतात.

४) **सोईची जागा व वेळ :** प्रशिक्षणार्थ्यांची अडचण व गरज लक्षात घेऊन गैरसोय टाळण्यासाठी त्यांच्या सोईच्या ठिकाणी सोईच्या वेळेनुसार कोर्सेसचे आयोजन केले जाते.

५) **मातृभाषेतून शिक्षण :** शिक्षणात भाषेची अडचण येऊ नये यासाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे.

६) **कमीत कमी फी आकरणी :** जन शिक्षण संस्थानमधील (श्रमिक विद्यापीठ) प्रशिक्षणाचा लाभ सर्वसामान्य विद्यार्थ्यांना घेता यावा म्हणून अभ्यासक्रमासाठी आकारलेली फी परवडण्यासारखी असते.

७) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार NSQF Syllabus

८)

❖ **प्रमाणपत्र :** अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर व परिक्षेत उर्त्तीण झाल्यानंतर प्रमाणपत्रे दिली जातील. जन शिक्षण संस्थान (श्रमिक विद्यापीठ) भारत सरकार पुरस्कृत असल्यामुळे प्रमाणपत्राचा उपयोग संपूर्ण देशात स्वयंरोजगारासाठी व नोकरी मिळविण्यासाठी केला जाऊ शकतो. परिक्षा देण्यासाठी व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी ८०% असणे आवश्यक आहे.

❖ **प्रवेशासंबंधी सर्वसाधारण :** १. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश अर्ज भरून द्यावा लागतो. २. प्रवेश अर्जासोबत कोणत्याही शैक्षणिक सत्यप्रतीची आवश्यकता नाही. फक्त दुर्बल घटकांना व सामाजिक मागासवर्गीयांना जातप्रमाणपत्राची सत्यप्रत द्यावी लागेल. ३. अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेली फी आकरली जाते. ४. अभ्यासक्रमाच्या फीमध्ये गरजेनुसार बदल होण्याची शक्यता असते. ५. प्रशिक्षणासाठी व प्रमाणपत्रासाठी दोन पासपोर्ट फोटो आवश्यक आहे. ६. प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्रासाठी लेखी, प्रत्याक्षिक परिक्षा देणे व रेकॉर्ड बुक, सॅम्पल बुक तयार करणे आवश्यक आहे. ७. प्रशिक्षण संपल्यावर प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणाबाबात काही अडचण आल्यास त्याला सवलतीच्या दरात पुन्हा प्रशिक्षणाची सोय. ८. प्रशिक्षणार्थीना अभ्यासक्रमाची

फी कार्यालयातच जमा करून लगेच फी भरल्याची पावती घ्यावी. ९. प्रवेशासाठी रेशनकार्ड/आधारकार्ड/ मतदान कार्ड यार्पकी एकाची छायांकित प्रत आवश्यक. कार्यालयाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही फी भरू नये त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या प्रशिक्षणार्थ्यांची राहील. अभ्यासक्रमासाठी भरलेली फीस फक्त कार्यालयीन कारणामुळे कोर्स सुरू झाला नाही तरच परत मिळेल. इतर कोणत्याही कारणाचा विचार केला जाणार नाही.

| प्रशिक्षणाचे नांव | | |
|---|---|---|
| **शिवणकाम व भरतकाम** | | |
| | कटींग टेलरींग | ९० दिवस |
| | अॅडव्हान्स टेलरींग | ९० दिवस |
| | हॅण्ड एब्रायडरी | १५ दिवस |
| | कापडी फॅन्सी बॅग्ज मेकींग | ३० दिवस |
| | ब्लाऊज मेकींग | ३० दिवस |
| | ड्रेस मेकींग | ३० दिवस |
| **सौंदर्य साधना** | | |
| | बेसीक ब्युटीकल्चर | ६० दिवस |
| | ज्वेलरी मेकींग | ३० दिवस |
| | मेहंदी (अरेबीक, दुल्हन मेहंदी) | १५ दिवस |
| | रांगोळी | १५ दिवस |
| **खाद्य वस्तू तयार करणे** | | |
| | बेकरी व कन्फेक्शनरीज<br>(विविध केक, आयसिंग व चॉकलेटस तयार करणे) | ६० दिवस |
| | चाट मेकर | ०७ दिवस |
| | चायनीज डिशेश | ०७ दिवस |
| | पंजाबी डिशेश | ०७ दिवस |
| | साऊथ इंडियन डिशेश | ०७ दिवस |
| | सॉस, जॅम, जेली तयार करणे | ०७ दिवस |
| **कुटीर उद्योग** | | |
| | सॉफटटॉईज मेकींग | ३० दिवस |
| | खडू, मेणबत्ती, अगरबत्ती तयार करणे | ०७ दिवस |
| | डिटर्जंट पावडर, लिक्वीड सोप, नीळ तयार करणे | ०७ दिवस |
| | विणकाम/क्रोशा/मायक्रम | ९० दिवस |
| | बांधणी व बाटीक पेटींग | ३० दिवस |
| **तंत्रशिक्षण** | | |
| | फोटोग्राफी व्हीडीओ शुटींग | ९० दिवस |

| | | |
|---|---|---|
| | इलेक्ट्रीकल टेक्निशियन | ३० दिवस |
| | मेटेनन्स ॲण्ड रिपेअरींग ॲटोमोबाईल (टु व्हिलर) | १८० दिवस |
| **शैक्षणिक प्रशिक्षण** | | |
| | मॉंटेसरी टिचर ट्रेनिंग | १८० दिवस |
| | मोबाईल रिपेअरींग | ९० दिवस |

**कोर्सेस संबंधी चौकशी सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळता**
**सकाळी १०.३० ते सायं ०५.३० या वेळेत करावी**
**विना अनुदानित कोर्सेस**

| **Sl. No** | **Name of the course** | **Duration** |
|---|---|---|
| 01 | Beauty Culture and Health Care | 30 days |
| 02 | Advance Beautician | 30 days |
| 03 | Fashion Designing | 30 days |
| 04 | Hand Embroidery | 30 days |
| 05 | Hand Knitting, Macramé & Crochet | 30 days |
| 06 | Baking (Cake ) | 30 days |
| 07 | Cooking | 30 days |
| 08 | Early Childhood Education Workers **(Montessori Teacher)** | 90 days |
| 09 | Fabric Painting | 30 days |
| 10 | Computer Application Basic | 30 days |
| 11 | Photography & Video Shooting *(With Camera+ video Camera Charges)* | 30 days |
| 12 | Tie & Die | 15 days |
| 13 | Jewelry Making – any 5 items' | 30 days |
| 14 | Fruit and Vegetable Processing | 15 days |
| 15 | Bag Making | 15 days |
| 16 | Designer Blouse Making (Without material) | 30 days |
| 17 | Dress Making (Without material) | 30 days |
| 18 | Soft Toys Making | 30 days |
| 19 | Chock let Making | 10 days |
| 20 | Jute Making | 30 days |

**महाराष्ट्रातील जन शिक्षण संस्थानची पार्श्वभुमी :**

जन शिक्षण संस्थानची स्थापना शिक्षण व सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांनी सन १९६७ मध्ये जगामधील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळख असलेल्या वरळी मुंबई येथे स्थापन केले होते. १९६७ मध्ये या योजनेला श्रमिक विद्यापीठ म्हणून नाव देण्यात आलेले होते. या योजनेचा मुख्य हेतू हा उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरविणे होता. कालांतराने यात विविध बदल होत गेले व योजनेचे स्वरूपसुध्दा बदलले. सन २००० मध्ये मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली श्रमिक विद्यापीठाचे नाव बदलून जन शिक्षण संस्थान असे केले. तसेच यामध्ये निरक्षर, नवसाक्षर व अल्पशिक्षित महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याबाबत धोरण ठरविले. आज रोजी भारतामध्ये एकून ३०१ जन शिक्षण संस्थान असुन त्यांच्यामार्फत विविध प्रकारचे कौशल्यविकास प्रशिक्षण राबविण्यात येतात. महाराष्ट्रामध्ये विविध जिल्हयामध्ये एकूण २१ जन शिक्षण संस्थान कार्यरत असून त्यांच्यामार्फत जिल्हयाच्या मागणीनुसार (Need based) प्रशिक्षणाचे आयोजन केल्या जाते.

**जन शिक्षण औरंगाबाद यांची पार्श्वभूमी –**

इंडियन इन्स्टिटयुट ऑफ रूरल वर्कस ही संस्था जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी स्व.विजयेंद्र काबरा यांनी १९८० साली स्थापन केली. समाजातील घटक परंपरागत शिक्षण घेऊन देखील बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढ होत असल्याने ही बेरोजगारांची फौज रोखण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण वर्ग सुरू केले. संपूर्ण समाजाला प्रशाला बनविण्याच्या हेतूने प्रेरित होऊन व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात येऊन जिल्हयात विविध ठिकाणी ग्रामिण व झोपडपट्टीमधील लाभार्थी डोळ्यासमोर ठेवून डेअरी डिप्लोमा, टेलरिंग, ब्युटीपार्लर, विविध खाद्य पदार्थ बनविणे, इलेक्ट्रीशियन, प्लबिंग, बेकरी असे विविध प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ रूरल वर्कस संस्थेला मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्लीच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत दि. ०१ डिसेंबर १९८५ रोजी मराठवाड्यातील पहिले जन शिक्षण संस्थान (श्रमिक विद्यापीठ) स्थापन करण्याकरीता मंजुरात प्रदान केली. जन शिक्षण संस्थान, औरंगाबादच्या स्थापनेनंतर शासनाच्या उद्दिष्टानुसार ग्रामिण व शहरी भागामधील निरक्षर, नवसाक्षर, अल्पशिक्षित व सुशिक्षित बेरोजगार युवक - युवतींना व महिलांना स्वंयरोजगार प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. गाव तिथे प्रशिक्षण केंद्र या धर्तीवर चालविण्यात येणा-या उपक्रमांच्या माध्यमातून गत ३५ वर्षामध्ये जन शिक्षण संस्थान (श्रमिक विद्यापीठ) औरंगाबादद्वारे विविध लाभार्थ्यांना प्रशिक्षण देवून अनेकांना रोजगार, स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून दिले जात आहे. तसेच केंद्रशासनाच्या दिशानिर्देशानुसार केंद्राच्या विविध योजनांची माहिती गावपातळीवर जावून दिली. त्यामध्ये जन धन योजना, प्रधानमंत्री विमा योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, अटल पेंशन योजना, स्वच्छता विषयक उपक्रम, कौशल्य व उपजिविका उपक्रम, तसेच मागील ३ वर्षापासून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार जिल्हयामध्ये स्वच्छता पंधरवाड्याचे आयोजन मोठ्या प्रमाणामध्ये करण्यात येते. तसेच यामाध्यमातून गावपातळीवर वृक्षारोपन व संवर्धन कार्यक्रमांचे आयोजनसुध्दा करण्यात येते.

**कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाकडे हस्तांतरण व निवन स्वरूपात योजनेची अंमलबजावणी –**

भारत हा सध्याच्या युगात असलेला सर्वात युवा देश आहे. त्यामुळे मनुष्यबळाचा योग्य वापर होण्यासाठी विकास करणे गरजेचे आहे. भारत जागतिक महासत्ता व्हावा असे जर वाटत असेल

तर देश स्वावलंबी होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक कुटुंबामधील व्यक्ती पर्यायाने कुटुंबाने स्वावलंबी होणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेवून मा. पंतप्रधान यांनी स्वतंत्र कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. देशामधील सर्व कौशल्य विकास सेवा देणारे सर्व उपक्रम हे एकाच छताखाली आणण्यास सुरूवात केली व दिनांक ०२ जुलै २०१८ पासून जन शिक्षण संस्थान ही योजना मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून कौशल्यविकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यानुसार खालील उदिष्टये व वैशिष्ट्यांना अनुसरून कौशल्य विकास प्रशिक्षण व रोजगार विषयक कार्यक्रमांचे आयोजनाचे कार्य सुरू आहे.

**जन शिक्षण संस्थानद्वारे प्रशिक्षण कुणासाठी –**

- आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या वंचितांसाठी
- सर्व जाती-जमाती, मागास व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयासाठी
- विधवा, परितक्ता, अपंग व दुर्बल घटकांसाठी
- अकुशल, बेरोजगार युवक-युवती व महिलांसाठी

**❖ वैशिष्ट्ये :**

१) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार NSQF Syllabus

२) गरजेनुसार प्रशिक्षण

३) प्रशिक्षणासाठी गावाजवळ सोईची जागा व वेळ

४) मातृभाषेतून प्रशिक्षण

५) नाममात्र प्रशिक्षण शुल्क आकरणी

६) तज्ञ व प्रशिक्षित प्रशिक्षक वर्ग

७) प्रशिक्षणा दरम्यान स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन

**❖ जन शिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेण्याकरिता पात्रता / निकष**

१) निरक्षर, नवसाक्षर, अल्पशिक्षित व साक्षर (अभ्यासक्रमाच्या निकषानुसार)

२) वयोमर्यादा १५ ते ४५ वर्ष

३) शाळाबाह्य अथवा शाळा सोडलेले विद्यार्थी

**प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे**

१) आधारकार्ड/राशनकार्ड/मतदार ओळखपत्र/ वाहन परवाना

२) गुणपत्रिका/शाळा सोडल्याचा दाखला

३) जात प्रमाणपत्र/दारिद्र्यरेषेचे कार्ड/अपंगत्वाचा दाखला (अपंगत्व असल्यास)

४) दोन पासपोर्ट आकाराचे फोटो इ.

**मुल्यमापनाची पध्दत व प्रमाणपत्र**

१) लेखी गुण - १५, प्रात्याक्षिक गुण - ६०, तोंडी गुण - ५ व अंतर्गत मूल्यांकन - १५ गुण

२) मुल्यांकनाकरिता ८०% उपस्थिती आवश्यक आहे.

३) प्रशिक्षणार्थ्यांचे मूल्यमापन हे पुरावादर्शक पध्दतीद्वारे केले जाते.

४) मूल्यमापनाकरीता परिक्षक म्हणून त्या विषयामधील तज्ञ व्यक्तिंच्या उपस्थितीत व गावपातळीवरील प्रतिष्ठीत व्यक्ती/मुख्याध्यापक यांच्या निरीक्षणाखाली घेतली जाते.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांचे मूल्यमापन केल्यानंतर मूल्यमापनामध्ये उत्तीर्ण झालेल्या लाभार्थ्यांना त्यांना मिळालेल्या गुणानुसार अ, ब, व क या श्रेणीचे प्रमाणपत्र देण्यात येते. सदर प्रमाणपत्राचा उपयोग बँका किंवा वित्तीय संस्थाकडून निकषानुसार कर्ज प्राप्तीकरीता खाजगी किंवा सरकारी क्षेत्रामध्ये नोकरी मिळविण्याकरीता अथवा स्वयंरोजगार मिळविण्याकरीता होतो. तसेच सदर प्रमाणपत्राचा उपयोग सेवायोजन कार्यालयामध्ये रोजगार नोंदणीकरीता करता येतो. सदरचे प्रमाणपत्र कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत बारकोड पध्दतीने तयार केले जाते.

**मुल्यमापनाची पध्दत**






श्री विजयेंद्र काबरा स्मृती सभागृह
भारत सरकार पुरस्कृत
जन शिक्षण संस्थान, औरंगाबाद
(श्रमिक विद्यापीठ)
कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय
नवी दिल्ली






श्री विजयेंद्र काबरा स्मृती सभागृह
जन शिक्षण संस्थान, औरंगाबाद
कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय
नवी दिल्ली


5-6-203, Shri Krishna Colony, Chikalthana, Aurangabad, Maharashtra 431007, India
Aurangabad
Maharashtra
India
27°C
81°F
2020-12-23(Wed) 05:13(PM)


Unnamed Road, Padegaon, Aurangabad, Maharashtra 431002, India
Aurangabad
Maharashtra
India
28°C
82°F
2021-01-01(Fri) 04:04(pm)

## जन शिक्षण संस्थान, औरंगाबाद विविध कार्यक्रमाचे फोटो





**जागतिक महिला दिन**






१५ ऑगस्ट निमित्त ध्वजारोहण





जागतिक पर्यावरण दिन






वर्धापन दिवस







जन शिक्षण संस्थान औरंगाबाद वर्धापन दिन






कौशलाचार्य अवॉर्ड २०२०

| | |
|---|---|
|  |  |
|  |  |
|  |  |

**स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत वृक्षारोपन, गांडूळखत निर्मिती, वैयक्तिक स्वच्छता, घोषवाक्य इ. कार्यक्रमाचे आयोजन**




प्रमाणपत्र वितरण




आंतरराष्ट्रीय योगा दिवस












प्रशिक्षिकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा





युवा कौशल्य दिवस व स्वच्छता शपथ






गव्हर्निंग कौन्सिल मिटींग












## जन शिक्षण संस्थान औरंगाबाद विविध कोर्सेस

| | |
|---|---|
|  |  |
| **Apparel. Made-Ups & Home Furnishing [Hand Embroiderer (Addawala)]** | **Apparel. Made-Ups & Home Furnishing Self Employed Tailor** |
|  |  |
| **Beauty & Wellness [Assistant Hair Stylist]** | **Beauty & Wellness [Assistant Beauty Therapist]** |

| | |
|---|---|
|  |  |
| **Handicrafts & Carpets [Stringing/Beading Artisan (Fashion Jewellery)]** | **Handicrafts & Carpets [Traditional Hand Embroiderer]** |
|  |  |
| **Handicrafts & Carpets [Jute Product Maker]** | **Plumbing [Plumber (General) Helper]** |
|  |  |
| **Electronics & Hardware [Field Technician - Other Home Appliances]** | **Handicrafts & Carpets [Hand Rolled Agarbatti Maker]** |

यशकथा

| | |
|---|---|
|  |  |
| Shaikh Khaleel Ullahh Shaikh Kaleem Ullaha | Neeta Pradeep Biradar |
| Electrical Technician [Basic-Electricity, Electronics and House Wiring (Module I)] | Beauty Culture & Healthcare [Make up (Module I)] |
|  |   |
| | Tayyab Khan Aamir Khan |
| Electrical Technician [Basic-Electricity, Electronics and House Wiring (Module I)] | Plumbing & Sanitary Work (Modula I & II) |
| | |
| | |
| Diksha Suresh Wankhede | |

| | |
|---|---|
| Beauty culture and Health Care and Hair care and setting | |
| | |
| | |
| | |